**<u>वादीतर्फे सा.क्र.१ (वादी स्वतः) चा पुढील सरतपास वादीतर्फे</u>**

**<u>विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

मी हनुमंत रामचंद्र पाटील, वय-७६ वर्षे, व्यवसाय- सेवानिवृत्त शिक्षक, रा. बाम्हणे, ता. शिंदखेडा जि. धुळे शपथ घेऊन सांगते की,

१५. माझ्या सदरहु सरतपासाच्या शपथपत्रावरील सही माझी असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी प्रस्तुत कामी नि. क्र. ३/४ कडे सौदापावतीचा दस्त दाखल केलेला आहे. सदर दस्तावरती माझी व प्रतिवादी प्रकाश नामदेव मिस्तरी यांची सही आहे. तसेच त्याच्यावरती साक्षीदार युवराज शांताराम व निलकंठ सोनवणे यांच्या सहया आहेत. सदर दस्तातील मजकुर प्रकाश नामदेव सुतार याच्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर **सौदापावतीस नि. क्र. ४७** देण्यात येते.) तसेच मी नि.क्र. ३/५ कडे प्रतिवादी प्रकाश नामदेव सुतार यांस पाठविलेल्या पत्राचा बंद लखोटा हजर केलेला आहे. त्याच्यावरती पोस्टमन याचा शिक्का व सही आहे. सदर बंद पाकीट हे परत आले होते. (करीता सदर **बंद पाकीटास नि.क्र. ४८** देण्यात येते.) (आता न्यायालयासमक्ष बंद लखोटा उघडण्यात आला. सदर बंद पाकीटातील पत्र साक्षीदारास दाखविण्यात आले.) हि मी प्रकाश नामदेव सुतार याला वकीलांमार्फत दिनांक ०५.०६.२०१७ रोजी पाठविलेली नोटीस आहे. त्याच्यावरती माझी व माझे वकील श्री. पी.जी. पाटील यांची सही आहे. सदर नोटीस माझ्या सांगण्याप्रमाणे दिली होती. ती शेतीच्या संदर्भात दिली होती. सदर नोटीसीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर **नोटीसीस नि.क्र. ४९** देण्यात येते.) तसेच मी नि. क्र. ३/६ कडे मी प्रतिवादीस दिनांक २०.०६.२०१७ रोजी पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केलेली आहे. आता मला दाखविण्यात आलेली नोटीसीची स्थळप्रत तीच आहे. त्याच्यावरती माझी व माझे वकील श्री. पी.जी. पाटील यांची सही आहे. सदर नोटीस माझ्या सांगण्याप्रमाणे दिली होती. सदर नोटीसीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर **नोटीसीस नि.क्र. ५०** देण्यात येते.) तसेच मी नि.क्र. ३/७ कडे नि. क्र. ५० कडील नोटीस प्रतिवादीस पाठविलेल्याबाबतची पोस्टाची पांढरी पावती दाखल केलेली आहे. तीच्यावर

प्रतिवादीचा पत्ता व पोस्टाचा शिक्का आहे. (करीता सदर **पोस्टाच्या पावतीस नि. क्र. ५१** देण्यात येते.) तसेच मी नि.क्र. ३/८ कडे नि. क्र. ५० कडील नोटीस प्रतिवादीस पाठवुन त्याला मिळाले बाबतची आरपीएडीची पोहच पावती दाखल केलेली आहे. तीच्यावर प्रतिवादीची सही व पोस्टाचा शिक्का आहे. (करीता सदर **पोस्टाच्या पोहच पावतीस नि. क्र. ५२** देण्यात येते.) मी प्रतिवादीस दिलेल्या नोटीसीस प्रतिवादीच्या मुलाने विधीज्ञ श्री. आयचीत यांच्यामार्फत उत्तर दिले होते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे** –

(प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन वादीचा उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब)

श्रवणोत्तर स्वीकृत

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.04.08 11:16:53 +0530

दिनांक : ०६/०४/२०२४
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर,
दोंडाईचा